| MHRG040001152002 | एल.ए.आर. क्र. ९९/२००२<br>**जैतू नामा मुंढे वगैरे वि. विशेष भुसंपादन अधिकारी** |
| --- | --- |

## अर्ज नि.२४, २६ व २८ वरील सामाईक आदेश

सदर नि.क्र. २४ मुळ अर्जदार क्र.१ कै. जैतू नामा मुंढे यांचा रेफरन्स अर्ज अबेट झाला असल्याने अबेटमेंट रद्द करण्याकरीता व नि.क्र.२६ वरील अर्ज मुळ अर्जदार क्र.१ कै. जैतू नामा मुंढे यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी झालेला विलंब माफीचा व नि.क्र.२८ त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. अर्जांचे अवलोकन केले. सहा.सरकारी वकील यांनी नि.क्र.६२ वर म्हणणे दाखल करून हरकत घेतली व अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

०३. अर्जांचे अवलोकन केले असता निदर्शनास येते की, मुळ अर्जदार क्र.१ दि.१९/०३/२०२५ रोजी मयत झाले, परंतू सदरचे अर्ज दाखल करण्यास बराच विलंब झाला आहे. अर्जदारांनी विलंबाबत कोणतेही कारण नमूद केलेले नाही. परंतू, त्यांचे म्हणणे असे आहे की विलंब माफ करून त्यांना वारस म्हणून सदर प्रकरणात दाखल केल्यास सामनेवाल्याच्या हक्कावर बाधा येणार नाही. सदरचे अर्ज खारीज केल्यास अर्जदारांचे अपरिमित नुकसान होईल.

०४. सरकारी वकीलांनी नि.क्र.६२ वर म्हणणे दाखल करून आक्षेप नोंदविला की, अर्जांत विलंबाचा खुलासा केलेला नाही. विलंबाची कारणे न्याय व रास्त नसल्याने फेटाळण्यात यावेत.

०५. सरकारी वकीलांनी युक्तीवाद केल्याप्रमाणे सदर अर्जदाराना बराच विलंब होण्यास काय कारण घडले याचा अर्जदारानी खुलास केलेला नाही. परंतू सदरच्या कारणावरून जर अर्ज फेटाळण्यात आला तर मुळ अर्जदार यांच्या वारसांवर अन्याय होईल. सदरचे प्रकरण भूसंपादनाचा वाढीव मोबदला मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदरचे अर्जदार शपथेवर सांगतात की, त्यांचे व्यतिरीक्त मयत मुळ अर्जदारांचे इतर कोणीही वारस नाहीत. सदर कथने गृहित धरून अर्जदारांना वारस म्हणून दाखल करणे न्यायाचे ठरेल. तसे केल्याने सामनेवालाचे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता, अर्ज रक्कम रू.१,५००/- खर्चावर मंजुर करणे उचित असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि.क्र. २४, २६ व नि.क्र.२८ वरील अर्ज खर्च रक्कम रू. १,५००/- (अक्षरी रूपये एक हजार पाचशे मात्र) जिल्हा विधी सेवा केंद्रास देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येते.

२. अर्जदार यांनी आज पासुन १४ दिवसांच्या आत दुरूस्ती करुन खर्चाचे आदेश पुर्ण केल्यानंतर दुरुस्ती प्रत अभिलेखावर घ्यावी.

३. अर्ज खुल्या न्यायालयातुन घोषित करण्यात आले.

VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR
Digitally signed by VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR
Date: 2026.02.24 17:50:47 +0530

पनवेल. (व्ही. आर. हंगरगेकर)

दिनांक – २४/०२/२०२६. सह दिवाणी न्यायाशीश, व. स्तर, पनवेल.